**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

प्रति,
संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिद्धीकरिता सादर

१८/०२/१९

(बाळासाहेब झोडगे)
हं. जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९६

**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२६

दिनांक : १८.०२.२०१९

**उच्च माध्यमिक (H.S.C.) तसेच माध्यमिक (S.S.C.) शालांत परीक्षार्थी विद्यार्थ्यांकरिता परीक्षा कालावधीत बेस्ट उपक्रमाने उपलब्ध केलेल्या सुविधांबाबत.**

मुंबई, १८ - दि.२१ फेब्रुवारी,२०१९ ते २० मार्च, २०१९ दरम्यान उच्च माध्यमिक (H.S.C.) परीक्षा आणि दि.१ मार्च, २०१९ ते २२ मार्च, २०१९ दरम्यान शालांत (S.S.C.) परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे. परीक्षा कालावधी दरम्यान परीक्षेला दाखल होणा-या विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता बेस्ट उपक्रमाच्यावतीने पुढीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत.

१) परीक्षा कालावधीमध्ये बसपासधारक विद्यार्थ्यांचे बसपास त्यांचे निवासस्थान आणि परीक्षा केंद्र या दरम्यान वैध मानण्यात येतील. सदर विद्यार्थ्यांना वेगळे प्रवासी तिकीट घ्यावे लागणार नाही.

२) परीक्षा कालावधीमध्ये महापालिका विद्यार्थी – ज्यांच्याकडे बसपास उपलब्ध नाहीत – अशा विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्राच्या प्रवेशपत्रावरील शाळेचा शिक्का पाहून संबंधित विद्यार्थी महापालिका शाळेचा विद्यार्थी असल्याची खात्री करुन पूर्ण प्रवासभाडे 'न' आकारता सवलतीचे प्रवासभाडे आकारण्यात येईल.

३) परीक्षा कालावधीमध्ये परीक्षार्थी विद्यार्थ्यांना बसगाडीमध्ये पुढील प्रवेशद्वाराने बसगाडीत प्रवेशाची मुभा राहील.

४) परीक्षार्थी विद्यार्थ्यांना प्राधान्याने बससेवा उपलब्ध व्हावी, याकरिता गर्दीच्या बसथांब्यावर अधिकारी / पर्यवेक्षकीय कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच शालेय व्यवस्थापनाकडून सूचना आल्यास अतिरिक्त बसगाडयांचे प्रवर्तन देखील करण्यात येणार आहे.

सर्व प्रवासी जनतेने विशेषतः परीक्षार्थी विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी बेस्ट उपक्रमातर्फे उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची नोंद घेऊन, बसप्रवास करावा.

=====